# जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२
**दूरध्वनी** ०७२१-२६६२०२५ **फॅक्स** ०७२१-२६६२८४३
**ईमेल** : rdc.amravati@gmail.com **वेबसाईट** : amravati.nic.in

क्र.कक्ष-२१/आस्था/अका/कावि/१७९/२०१६ दिनांक ३० डिसेंबर, २०१६

वाचा :१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.तशिप्र-२०१२/प्र.क्र.२४२-अ/ई-१०, दि. २४.३.२०१४
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.टीआरएन-२०१५/प्र.क्र.६०/१५/१२-अ, दि.२४.०६.१५

## आदेश

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयाचे अनुषंगाने, जिल्हाधिकारी, अमरावती अधिनस्त क्षेत्रिय आस्थापनेवरील गट "क" तलाठी संवर्गातील सरळसेवेची रिक्त पदे भरण्याकरीता शासनाचे निर्देशानुसार पदभरती २०१६ राबविण्यात आली असून निवड प्रक्रियेद्वारे गुणवत्ता यादीनुसार निवड केलेल्या खालील उमेदवारांना त्यांच्या नावासमोर स्तंभ क्रमांक ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे खालील नमुद अटी व शर्तीच्या आधारे तलाठी पदावर रु.५२००-२०२०० (ग्रेड वेतन २४००) या वेतन श्रेणीत पदस्थापना देण्यासाठी संबंधीत उप विभागीय अधिकारी तथा नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे शिफारस करण्यात येत आहे. संबंधीत उप विभागीय अधिकारी यांनी शिफारस केलेल्या उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करुन नियुक्ती आदेश निर्गमीत करण्याबाबत कार्यवाही करावी.

| अ.क्र. | नवनियुक्त तलाठयाचे नाव | निवडीचा प्रवर्ग | उपविभागाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. रोशन अरुणराव पकडे | खुला | मोर्शी |
| २ | श्री. निखिल चंद्रशेखर बेलोकार | खुला | अचलपुर |
| ३ | कु. सोनाली दिवाकरराव चौधरी | खुला (महिला) | मोर्शी |
| ४ | श्री. आशिष श्रीनिवास काळे | खुला | अचलपुर |
| ५ | कु. भाग्यश्री अरुणराव वानखडे | खुला (महिला) | दर्यापूर |
| ६ | कु.मुशफिका बानो मुझफ्फर सय्यद | खुला (महिला) | दर्यापूर |
| ७ | श्री.सुरज काशिनाथराव रताळे | भ.ज.ब. | दर्यापूर |
| ८ | श्री. प्रतिककुमार अशोक चव्हाण | वि.जा.अ. | अचलपुर |
| ९ | कु. रक्षा सुभाष डोल्लरवार | खुला (महिला) | अचलपुर |
| १० | श्री. योगेश संजय डोळे | खुला (अपंग) | दर्यापूर |
| ११ | कु. माधवी बाबुलाल भिलावेकर | अ.ज. (पेसा) (महिला) | धारणी |
| १२ | श्री. राकेश रामलाल सावलकर | अ. ज. (पेसा) | धारणी |
| १३ | कु. माधुरी लाला व्हेराटे | अ. ज. (पेसा) | धारणी |
| १४ | श्री. रोबीन रामकिशन जांबु | अ. ज. (पेसा) | धारणी |
| १५ | श्री. रविकुमार मंगल भिलावेकर | अ. ज. (पेसा) | धारणी |
| १६ | श्री. निलेश रमेश पटेल | अ. ज. (पेसा) | धारणी |
| १७ | कु. पदमिनी धनसिंग धुर्वे | अ. ज. (पेसा) | धारणी |

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.तशिप्र-२०१२/प्र.क्र.२४२-अ/ई-१०, दि.२४.०३.२०१४ नुसार निवड झालेल्या उमेदवारांना/नवनियुक्त तलाठी यांना अनुभवी तलाठी यांचे

कार्यालयात दोन महिने प्रशिक्षण व प्रबोधिनी येथे चार महिन्याचे पायाभूत प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. नवनियुक्त तलाठी जोपर्यंत पायाभूत प्रशिक्षण पूर्ण करीत नाहीत, तोपर्यंत त्यांना नियमित पदस्थापना देण्यात येऊ नये. त्यांना "परिविक्षाधीन कर्मचारी" म्हणून मानण्यात येईल. तसेच प्रशिक्षण कालावधीत तलाठयांनी प्रशिक्षण पूर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित सक्षम अधिकारी यांचेकडून प्राप्त झाल्यानंतरच तलाठी पदावर खालील नमुद अटी व शर्ती नमुद करुन नियमित पदस्थापना देण्याची कार्यवाही संबंधीत उप विभागीय अधिकारी तथा नियुक्ती प्राधिकारी यांनी करण्यात यावी.

## सदर नियुक्तीस खालील अटी व शर्ती लागू राहतील.

१) उपरोक्त उमेदवारांची निवड भविष्यामध्ये न्यायालयीन आदेश, शासन आदेश किंवा इतर कोणत्याही कारणास्तव तलाठयांची पदे कमी झाल्यास उमेदवाराची निवड रद्द केल्या जाईल व उमेदवारास शासकीय नोकरीबाबत कोणताही हक्क प्रस्थापीत करता येणार नाही. या अटीवर करण्यात आली असल्यामुळे **भविष्यात कोणत्याही कारणास्तव तलाठयांची पदे कमी झाल्यास त्यांची नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता कायम स्वरुपी समाप्त करण्यात येईल.**

२) उमेदवाराची नियुक्ती अस्थायी आस्थापनेवर पुर्णत: तात्पुरत्या स्वरुपाची असुन, आपण सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे उमेदवाराची निवड करण्यात आलेली आहे. सदर कागदपत्र बनावट/खोटे असल्याचे आढळुन आल्यास आपली शासन सेवा पुर्वसुचना न देता किंवा कोणतेही कारण न दर्शविता समाप्त करण्याची नियुक्ती अधिकाऱ्यांचे अधिकार अबाधीत असतील व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतल्या जाणार नाही.

३) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक अकपा-१०००/प्र.प्र.५९/२०००/८ दि.२४ सप्टेंबर, २००१ नुसार संगणक ज्ञानाचे (एमएस-सी.आय.टी.) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्र सादर न केल्यास आपली नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता संपुष्टात आणण्यात येईल.

४) मागासवर्गीय उमेदवारांनी त्यांचे जातीबाबत वैधता प्रमाणपत्र संबंधीत जात पडताळणी समितीकडून प्राप्त करुन नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे सादर करणे अनिवार्य राहील. जातीचे प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र खोट आढळुन आल्यास आपली नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ रद्द करण्यात येईल.

५) नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होतांना मुळ शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे, जन्म तारखेचा पुरावा संबधीत प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र व तत्सम शैक्षणिक पात्रतेची मुळ प्रमाणपत्र छायांकीत प्रतीसह (Attested) नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे सादर करणे अनिवार्य राहील.

६) सदर नियुक्ती संबंधीत पोलीस आयुक्त/जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेकडून करण्यात येणाऱ्या सचोटी व चारीत्र्य पडताळणीवर अवलंबून राहील. सदर अहवाल कोणत्याही टप्प्यावर असमाधानकारक आढळल्यास कोणतेही पुर्वसूचना न देता सेवा समाप्त करण्यात येईल.

७) जिल्हा शल्य चिकीत्सक, अमरावती यांचे शारीरीकदृष्टया सदर पदावर काम करण्यास पात्र असल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र एक महिन्याचे आंत कार्यालय प्रमुखाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

८) सेवेत रुजू झाल्यापासून चार वर्षात तिन संधीमध्ये तलाठी पदाकरीताची विभागीय दुय्यम सेवा परिक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

९) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अनियो-१००५/१२६/सेवा-४ दि.३१.१०.२००५ नुसार दि.१.११.२००५ नंतर शासकीय सेवेत नियुक्ती मिळालेल्या उमेदवारांना परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू ठरेल. दि.१ नोव्हेंबर, २००५ पुर्वी सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना लागू असलेली

निवृत्तीवेतन योजना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

१०) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ च्या अंमलबजावणीनुसार आपणास दि.२८.३.२००५ रोजी किंवा त्यानंतर हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल. हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा आढळुन आल्यास सेवा समाप्तीची कार्यवाही करण्यात येईल.

११) उन्नत व प्रगत गटात (क्रिमीलेअर) मोडत नसल्याचे प्रमाणपत्र लागू असलेल्या जाती प्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्तीपुर्वी सादर करणे अनिवार्य राहील.

१२) सेवेत रुजू झाल्यानंतर भारतीय संविधानाप्रती निष्ठा व गोपनियतेची शपथ घ्यावी लागेल.

१३) शासन सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास एक महिन्याची आगाऊ नोटीस अगर त्याऐवजी एक महिन्याचे वेतन सरकार जमा करावे लागेल.

१४) नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होण्याकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

१५) उमेदवाराने त्यांना नेमुन दिलेल्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे व मुळ प्रमाणपत्र सादर करावेत. रुजू झालेल्या उमेदवारास त्यांचे नियुक्तीच्या ठिकाणी वास्तव्य करणे अनिवार्य राहील.

१६) संबंधीत अधिकाऱ्यांने उमेदवारांना देण्यात आलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू करुन घेतेवेळी आवश्यक त्या अटी व शर्तीची तसेच आवश्यक प्रमाणपत्राची पुर्तता करुन घेणे आवश्यक आहे. उमेदवार रुजू झाल्याबाबतचा अहवाल या कार्यालयाकडे तात्काळ या कार्यालयास सादर करावा. महिलाकरीता आरक्षीत असलेल्या पदावर निवड झालेल्या महिला उमेदवाराची शिफारस शासन निर्णय दि.२५ मे, २००१ नुसार मा.आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून तपासणी प्रमाणपत्राच्या अधिन राहून करण्यात येत आहे. महिला आरक्षणाचे प्रमाणपत्र चुकीचे असल्याचे निर्देशनास आल्यास संबंधीत उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

१७) उमेदवारास आदेशाच्या दिनांकापासून तिस दिवसांचे आंत नियुक्तीच्या ठिकाणी रुजू व्हावे लागेल. कोणत्याही परिस्थीतीत रुजू होण्याकरीता मुदत वाढ दिली जाणार नाही. तसेच विहीत मुदतीत रुजू न झालेल्या उमेदवारांची नियुक्ती उमेदवारास कोणतीही नोटीस न देता रद्द करण्यात येईल.

१८) उमेदवारांना डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधनी, अमरावती येथे पायाभूत प्रशिक्षण समाधानकारकरित्या पूर्ण करणे बंधनकारक राहील. तसेच जे उमेदवार पायाभूत प्रशिक्षण समाधानकारकरित्या पूर्ण करणार नाहीत. सदर प्रशिक्षण असमाधारकारक आढळल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता सेवा समाप्त करण्यात येईल.

(किरण गित्ते)
जिल्हाधिकारी, अमरावती

प्रतिलिपी :

१) मा.विभागीय आयुक्त, अमरावती यांना माहितीकरीता सादर.
२) प्रभारी अधिकारी (आस्थापना/लेखा) जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती
३) उपविभागीय अधिकारी --------------
४) श्री/श्रीमती/कु.------------------------------------------------------------------------

जिल्हाधिकारी, अमरावती